**पेपर 7 : लोकप्रशासन  Public Administration**

.......................................................................................................................

## *Chapter One*

१. ........... यांना लोकप्रशासनाचा जनक असे म्हणतात.

— वुड्रो विल्सन

२. ............. यांनी लोप्रशासनाच्या संकलित दृष्टीकोनाचे समर्थन केले आहे.

— एल. डी. व्हाइट, हेन्री फेयॉल

३. ............. यांनी लोप्रशासनाच्या व्यवस्थापनात्मक दृष्टीकोनाचे समर्थन केले आहे.

— ल्युथर गलिक, हर्बर्ट सायमन

४. लोकप्रशासन.म्हणजे शासनाची चौथी शाखा असे कोणी म्हंटले आहे?

— विलोबी W. F.

५. सुसंस्कृत समाजाची गुरूकील्ली म्हणजे लोकप्रशासन— ही व्याख्या कोणाची?

— चार्लस ए. बिअर्ड

६. लोकप्रशासन हे .......... स्वरूपाचे शास्त्र आहे.

— सामाजिक

७. ल्युथर गलिक हे नाव ........... शी संबंधित आहे.

--POSDCORB

८. 'लोकप्रशासनात अशा सर्व कृतींचा आणि कार्यांया समावेश केला जातो की ज्यांचा उदेश सार्वजनिक धोरणांची पुर्तता किंवा अंमलबजावणी करणे हा असतो' असे ........यांनी म्हटले आहे.

— एल. डी. व्हाइट

९. POSDCORB मधील अक्षरांचा अर्थ ............

P- means Planning नियोजन,

O- means organization संघटन,

S- means Staffing कर्मचारी नियुक्ती,

D- means direction मार्गदर्शन,

CO- means coordination समन्वय,

R- Reporting अहवाल,

B- means budgeting अंदाजपत्रक

१०.वुड्रो विल्सन यांनी ...........सिध्दांत मांडला.

— प्रशासन राजकारण अलगीकरण

ASG Pol.Sci. Dept. 2023

## *Chapter Two*

१ संघटनेचा ............ औपचारीक घटकांना, तत्वांना, व रचनेला महत्व देतो.

—यांत्रिक दृष्टीकोण

२ 'समान हेतू साध्य करण्यासाठी निर्माण केलेली प्रत्येक मानवी संस्था म्हणजे संघटना होय' .— हे विधान जे. डी. मूने यांचे आहे?

३ संघटनेचा ....... अनौपचारीक घटकांना, मानवी संबंधांना, व मानवी प्रवृत्तींना महत्व देतो.

—मानवतावादी दृष्टीकोण

४ संघटनेचे चार आधारभूत घटक कोणते?

—प्रयोजन, प्रक्रीया, प्रजा व प्रदेश— (Purpose, Process, , Person, and Place)

५ ................ हे संघटनेचे तत्व नाही.

—भरती

६ ................ही संघटनेचे तत्वे आहेत.

—नियंत्रण कक्षा, पदसोपान, आज्ञैक्य, समन्वय, केंद्रीकरण—विकेंद्रीकरण

७ प्रत्यक्ष काम करणारा घटक म्हणजे —

— संघटनेचे रेषा घटक असे म्हणतात

८ सल्लागार घटकाचे उदाहरण—

— निती आयोग, राष्टपतींचे सचिवालय, पंतप्रधानांचे सल्लागार

९ .......... यांना संघटनेचे रेषा घटक असे म्हणतात

— खाते, लोकनिगम, स्वतंत्र स्वनियंत्रित मंडळे

१० एका वरीष्ठाच्या नियंत्रणखाली जेवढे लोक काम करु शकतात त्यास त्या वरीष्ठाची ........ असे म्हणतात.

— नियंत्रण कक्षा

११ प्रशासनात सत्ता जेंव्हा वरीष्ठ अधिकारी यांचेकडे एकवटते त्यास.......... म्हणतात.

— केंद्रीकरण

१२ प्रशासनात सत्ता जेंव्हा विविध स्तरावर विभागली जाते तेंव्हा त्यास.......... म्हणतात.

— विकेंद्रीकरण

## *Chapter Three*

१ 'एका निश्चित काळासाठी केलेली सरकारची आर्थिक योजना म्हणजे अंदाजपत्रक होय'—ही व्याख्या ........... यांची आहे.

— टेलर

ASSG Pol. Sci. Dept. 2023

२ जेंव्हा अंदाजपत्रकात जमा व खर्च समान असतो तेव्हा त्यास..............असे म्हणतात.

— संतुलित अंदाजपत्रक

३ जेंव्हा अंदाजपत्रकात जमा अधिक व खर्च कमी असतो तेव्हा त्यास..............असे म्हणतात.

— बचतीचे अंदाजपत्रक

४ जेंव्हा अंदाजपत्रकात जमा कमी व खर्च अधिक असतो तेव्हा त्यास..............असे म्हणतात.

— तूटीचे अंदाजपत्रक

५ अंदाजपत्रकाची अमलबजावणी करणे ही............ची जबाबदारी असते.

— अर्थमंत्रालयाची

६ अंदाजपत्रक प्रथम .......... मांडावे लागते.

— लोकसभेत

७ .............या संसदेच्या वित्तीय समित्या आहेत.

— लोकलेखा समिती, अनुमान समिती, लोकाद्योग समिती — या सर्व

८ भारतातील आर्थिक वर्ष कोणते ?

— १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर

९ अंदाज समितीत कीती सदस्य असतात

— ३० सदस्य

१० सार्वजनिक हीशेब समितीत किती सदस्य असतात?

— २२ सदस्य

११ नियंत्रक व महालेखापरीक्षक नेमणूक कोण करतात?

— कलम १४८ नुसार राष्टपती

१२ लोकनिगमाची उदाहरण सांगा.

— रिजर्व बॅंक ऑफ इंडिया, एल आय सी, एस. टी. महामंडळ,

१३ भारताचे विद्यमान ंअर्थमंत्री कोण आहेत?

—श्रीमती निर्मला सितारमन

## *Chapter Four*

१ पंतप्रधान व मंत्रिमंडळ हे प्रत्यक्षपणे ........... जबाबदार असतात.

— संसदेला / लोकसभेला

२ .............हे सुशासनाचे वैशिष्ठय नाही.

— दफ्तर दिरंगाई

ASSG Pol. Sci. Dept. 2023

३ .............हे सुशासनाचे वैशिष्ठय आहे.

— कायद्यानुसार प्रशासन,

—संगणक यंत्रणेचा वापर,

— जलद निर्णय प्रक्रिया

४ लोकप्रशासनातील मूलभूत नियम व कार्यपध्दतीची यांची माहीती नागरीकांना देण्यासाठी ........ . असते

— नागरीकांची सनद

५ कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवणारे संसदीय मार्ग कोणते?

— प्रश्नोत्तरांचा तास,

— स्थगन प्रस्ताव,

— अंदाजपत्रकावरील चर्चा,

..........................................................................................

**पेपर (8) : लोकप्रशासन Public Administration**

*घटक १ लोकप्रशासनाचा परिचय*

- लोकप्रशासनाचा अर्थ आणि स्वरूप
- लोकप्रशासनाची व्याप्ती व महत्व

..............................................................................

- **लोकप्रशासन अर्थ व व्याख्या (Public Administration)**

आधुनिक काळात लोकप्रशान हे अत्यंत महत्वाचे व आवश्यक शास्त्र म्हणून ओळखले जाते. प्रगत आणि अप्रगत अशा सर्वच राष्ट्रात लोकप्रशासनशास्त्र आढळते. आधुनिक काळातील राज्यांचे कार्यक्षेत्र व्यापक बनलेले आहे. आधुनिक समाजव्यवस्थेचे स्वरूप गुंतागुंतीचे व जटिल झालेले आहे. आधुनिक राज्याची कार्ये कवेळ पोलिसी राज्याची (Police-State) राहिलेली नसून ती अधिक व्यापक व कल्याणकारी बनलेली आहेत. आधुनिक राज्ये कल्याणकारी (Welfare) आणि जबाबदार (Responsible)राज्ये बनलेली आहेत. त्यामुळे प्रशासनाची जबाबदारी वाढलेली आहे. प्रत्येक राज्याला सामाजिक, भौतिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा विविध स्वरूपाची कार्ये पार पडावी लागत आहेत. अशा रितीने राज्यांची कार्यक्षेत्रे वाढल्यामुळे लोकप्रशासनाचे महत्व देखिल वाढले आहे. लोकप्रशासन म्हणजे शासनाची चौथी शाखा असे विलोबी यांनी म्हंटले आहे

अमेरिकन विद्यापीठांमध्ये १९ व्या शतकाच्या शेवटी लोकप्रशासन एक स्वतंत्र विषय म्हणून शिकविला जावू लागला. जरी लोकप्रशासन ही बाब प्राचीन काळापासून असली तरी त्याचा एक

ASSG Pol. Sci. Dept. 2023

शास्त्र म्हणून अभ्यास हा अधुनिक काळातील आहे. १८८७ साली वुड्रो विल्सन यांनी या विषयाची शास्त्रीय पध्दतीने मांडणी केली. त्यामुळे त्यांना लोकप्रशासनाचा जनक असे म्हटले जाते.

प्रशासन (Administration)- लोक प्रशानशास्त्राचे स्वरूप जाणून घेण्यासाठी प्रथम 'प्रशासन' ही संकल्पना समजून घेणे क्रमप्राप्त ठरते. Administration म्हणजे प्रशासन होय. *ad+ministrare* या लॅटिन शब्दापासून *'Administer'* या शब्दाची उत्पत्ती झाली आहे. या शब्दाच्या अर्थ — 'लोकांची काळजी घेणे' लोकांची सेवा करणे किवां कार्याची व्यवस्था पाहणे होय .

**एल.डी. व्हाईट :**

''एखादा हेतु साध्य करण्यासाठी अनेक व्यक्तींचे संचालन,संयोजन व नियंत्रण करणे म्हणजे प्रशासन होय ''

**अ) लोकप्रशासन : स्वरूप, अर्थ आणि व्याप्ती**

**लोकप्रशासनाचे स्वरूप** (Nature of Public Administration)

लोकप्रशासन शास्त्राचे स्वरूप जाणून घेताना पुढील दोन दृष्टिकोणांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

**अ) संकलित किवां सर्वव्यापी दृष्टिकोण**

**(The Integral View of Public Administration)**

जेव्हा एखादे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संधटनेतील सर्व घटकांच्या आणि त्यांच्या सर्व कार्याचा समावेश लोकप्रशानाच्या अभ्यासात केल जातो, तेंव्हा त्यास संकलित किवां सर्वव्यापी दृष्टिकोन असे संबोधले जाते. खात्यातील सर्व विभागांच्या आणि त्यांच्या उपविभागांच्या कार्याचा समावेश सर्वव्यापी दृष्टिकोणात केला जातो.

हेन्री फेयांल आणि एल.डी.व्हाईट यांनी लोकप्रशासनाच्या संकलित दृष्टिकोनाचे समर्थन केलेले आहे.

**ब) व्यवस्थापनात्मक दृष्टिकोन (The managerial View)** लोकप्रशानाच्या संबंसधीचा व्यवस्थापनात्मक दृष्टिकोण म्हणजे केवळ व्यवस्थापन करणे, इतराकहून कार्य करवून घेणे होय. संघटनेतील सर्व कर्मचाऱ्यांचा आणि त्यांच्या कार्याच्या प्रशासनात समावेश न करता केवळ वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्याचा समोवश प्रशासनात करणे म्हणजे व्यवस्थापनात्मक दृष्टीकोणातून अभ्यास करणे होय.

हर्बट सामन, स्मिथ बर्ग, थॉम्पसन, ल्युधर ग्युलिक, ऑडवे टिड, इत्यादी विचारवंतानी लोकप्रशासनाच्या व्यवस्थापनात्मक दृष्टिकोनणाचा पुरस्कार केला आहे.

**लोकप्रशासनाची व्याख्या —(Definition of Public Administration )**

**प्रो.एल.डी.व्हाईट —** ''लोकप्रशासनात अशा सर्व कृतींचा आणि कार्यांचा समावेश केला जातो की, ज्यांचा उददेश सार्वजनिक धोरणांची पूर्तता किवां अंमलबजावणी करणे हा असतो.''

ASSG Pol Sci. Dept. 2023

(Public Administration consists of all those operation having for their purpose the fulfillment of enforcement of public policy)

२) **प्रो.वुड्रो विल्सन :** ''कायदयाची तपशीलवार आणि पध्दतशीरपणे कार्यवाही करणे म्हणजे लोकप्रशान होय. कायद्याच्या कार्यवाहीसाठी केलेली प्रत्येक क्रिया ही प्रशासकीय क्रिया (कायदा) मानली जाते''

- **लोकप्रशासनाची व्याप्ती (Scope of public Administration )**

आधुनिक काळात लोकप्रशान शास्त्राची व्याप्ती व्यापक स्वरूपाशी बनलेली आहे.

**अ) हेन्री फेयॉल :** हेन्री फेयॉलने व्यवस्थापनात्मक दृष्टिकोणातून लोकप्रशानसाची व्याप्ती स्पष्ट केली आहे. फेयॉलच्या मते— लोकप्रशासनात पुढील पाच तत्वांचा समावेश केला जातो.

१) नियोजन— Planning २) संघटना —Organization ३) आज्ञा —Command

४)समन्वय —Co-ordination ५) नियंत्रण —Contol

प्रशासनात कोणतीही उदिदष्टे साध्य करण्यासाठी वरील पाच तत्वांचा स्वीकार करावा लागतो.

**ब) ल्युथर गलिक —**यांनी **POSDCORB** शब्दावरून लोकप्रशासनाची व्याप्ती स्पष्ट केली आहे. प्रशासनातील तत्वे आणि कार्ये विचारात घेऊन प्रशासन कार्याची व्याप्ती केली आहे. **Posdcorb** या शब्दातील अक्षरांचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे केलेले आहे.

**P-Planning –** नियोजन किंवा योजना: कार्याची रूपरेषा ठरविणे तसेच ते कार्य यशस्वी करण्यासाठी योग्य अशी कार्यपध्दती स्वीकारणे

**O-Organizing –** संघटना— प्रशासनाचे कार्य करण्यासाठी रचना निर्माण करावी लागते, विभाग—उपविभाग पाडून अधिकारपदांची स्थापना करावी लागते.

**S-Staffing –**कर्मचारी वर्गाची व्यवस्था— प्रशासन कार्यासाठी लागणाऱ्या कुशल, पात्र नोकरवर्गाची भरती करणे, त्यांना प्रशिक्षण देणे प्रशासनासाठी आवश्यक असते.

**D-Directing –** निर्णय घेणे, आज्ञा देणे, सूचना व मार्गदर्शन करणे —प्रशासनात कर्मचारी वर्गाला आदेश, सूचना, मार्गदर्शन करावे लागते.

**Co- Coordination –**समन्वय : संघटनेच्या विविध विभागात परस्पर संबंध प्रस्थापित करून त्यांच्यातील संघर्ष कमी करणे यास समन्वय असे म्हणतात.

**R- Reporting-** महिती अहवाल पाठविणे — प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशासना संबंधी माहिती दिले जाते. तसेच तपासनी, संशोधन आणि नोंदणी यांच्याव्दारे माहिती जमवून अहवाल तयार करणे.

ASG Pol. Sci. Dept. 2023

**B-Budgeting –** अंदाजपत्रक तयार करणे— अंदाजपत्रक निमिर्ती, त्यास मंजुरी, त्याची कार्यवाही, आर्थिक नियंत्रण, हिशेब व्यवस्था इ. गोष्टींचा समावेश आर्थिक प्रशासनात केला जातो.

ल्युथर गलिक यांच्या मते, प्रशासनातील सर्व कार्ये आणि प्रक्रिया सर्व प्रकारच्या संघटनात आढळून येतात. राष्ट्रीय, प्रांतीय व स्थानीय पातळीवरील अशा सर्व प्रशासनात पोस्टकॉर्ब दृष्टिकोण आढळतो.

सामान्यत: लोकप्रशासनाच्या व्याप्तीत पुढील विषयांचा समावेश करता येईल.

१) लोकप्रशासनशास्त्राचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती, विकास व महत्व

२) प्रशासकीय सिध्दांत आणि तत्वे

३) संघटनेचे स्वरूप, आधारभूत तत्वे, घटक आणि समस्या

४) प्रशासनवरील नियंत्रण — कायदेविषयक, कार्यकारीविषयक, न्यायविषयक आणि सामाजिक नियंत्रण

५) सेवक प्रशासनातील: नागरी सेवा, भरती, प्रशिक्षण, बढती, निवृत्ती, तटस्थता.

६) आर्थिक प्रशासनातील: अर्थसंकल्प —प्रक्रिया, आर्थिक नियंत्रण

७) व्यवस्थापन : नेतृत्व, धोरण निश्‍चिती, निर्णय निर्धारण प्रक्रिया, नियोजन, संसूचन, पर्यवेक्षण आणि जनसंपर्क

८) कल्याणकारी राज्य आणि स्थानिक प्रशासन

९) प्रदत्त कायदे, प्रशासकीय कायदे, प्रशासकीय न्याय

१०) आंतरराष्ट्रीय प्रशासन

११) शास्त्रीय व्यवस्थापन आणि प्रशासकीय सुधारणा (संघटन आणि पध्दती )

१२) प्रशासकीय जबाबदारी आणि प्रशासकीय समस्या

वरील विविध घटकांचा अभ्यास तात्विक आणि व्यवहारिक दृष्टिकोणातून लोकप्रशासन शास्त्रात केला जातो.

……………………………..

ASG Pol. Sci. Dept. 2023

- **लोकप्रशासनाचे महत्व**

लोकप्रशासनाचे जनक वुड्रो विल्सन यांनी यांनी राजकारण आणि प्रशासन यांच्या विलगीकरणाचा सिध्दांत मांडला आहे. त्यांच्या मते राजकीय नेत्यांनी प्रशासनात दखलअंदाजी करता कामा नये. धोरण ठरविणे हे राजकीय नेतृत्वाचे काम आहे. प्रशासन हे तठस्थ आणि निपक्षपातीपणे चालले पाहिजे. कल्याणकारी राज्यात लोकप्रशासनाचे महत्व वाढले आहे. शासन अनेक योजना जनतेसाठी तयार करते. त्या योजनांची प्रभावी अमलबजावणी प्रशासकीय यंत्रणा करते.

खालील मुद्दे प्रशासन महत्व स्पष्ट करतात

१. सचिव, जिल्हाधिकारी, ग्रमासेवक इ. प्रशासकीय अधिकारी प्रत्यक्ष शासनाच्या धोरणाची अमलबजावणी करतात.

२. प्रशासकीय अधिकारी व्यावसायिक असतात, त्यांचा उददेश लोकसेवा करणे हा असतो.

३. प्रशासकीय अधिकारी कुशल व तांत्रिक स्वरूपाचे ज्ञान असणारे असतात

४. प्रशासकीय अधिकारी निपक्षपाती व तटस्थ काम करत असतात

५. प्रशासकीय अधिकारी कायमस्वरूपी व निवृत्त होईपर्यंत पदावर काम करत असतात

६. राजकीय राजकीय नेतृत्व धोरण निर्मिती करतात याउलट प्रशासकीय अधिकारी धोरणाची अमलबजावणी करत असतात

७. कर रूपाने पैसा जमा करणे व त्याचा विनियोग करणे ही जबाबदारी लोकप्रशानाची आहे.

८. प्रशासकीय अधिकारी चाकोरीबध्द काम करत असतात

अशाप्रकारे लोकप्रशासनाचे महत्व स्पष्ट केले गेले आहे. शासनाच्या योजना सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी लोकप्रशासन मोलाची भूमिका पार पाडते.

..........................................................................

ASSG Pol. Sci. Dept. 2023